**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास, मृद व जलसंधारण विभाग
५ वा मजला, मंत्रालय विस्तार,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२

दूरध्वनी - (०२२) २२०२ २५२६
ई-मेल a.chandanshive@nic.in
वेबसाईट - https://waterconserve.maharashtra.gov.in

जा.क्र.क्रमांक : आस्थाप २०१६/प्र.क्र.८८ (भाग-९)/जल-२ दिनांक - ३१/०५/२०१७.

**प्रसिध्दीपत्रक :**

**विषय:** मृद व जलसंधारण विभागाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समायोजित होण्याकरिता विकल्प सादर करण्याबाबत.

**संदर्भ :** शासन निर्णय जलसंधारण विभाग क्र. आस्थाप २०१६/प्र.क्र.८८ (भाग-९)/जल-२, दिनांक ३१ मे, २०१७.

मृद व जलसंधारण विभागाच्या आस्थापनेकरिता एकूण १६४७९ पदांच्या आकृतिबंधास राज्य मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून या अंतर्गत जलसंधारण विभागातील कार्यरत व तात्पुरत्या प्रतिनियुक्तीवरील ६११५ पदे अंतर्भूत आहेत. तर ३८१ अतिरीक्त पदे जलसंपदा विभागाकडून या विभागाकडे वर्ग करण्यासाठी जलसंपदा विभागाने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे.

मृद व जलसधारण विभागांतर्गत स्वतंत्र मृदसंधारण यंत्रणा मंजूर करण्यात आली असून त्याकरिता कृषी विभागातील ९९६७ पदे कार्यरत अधिकारी कर्मचा-यांसह वर्ग करण्यास राज्य मत्रीमडळाने मान्यता दिलेली आहे. तर १६ पदे नव्याने निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

मृद व जलसंधारण विभागाच्या आस्थापनेवर आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद यांच्या अधिपत्याखाली जलसंधारण व मृदसंधारण या दोन स्वतंत्र यंत्रणा मंजूर करण्यात आलेल्या असून यांचा आकृतीबध व पदांची सख्या यांचा संरचनात्मक तक्ता या प्रसिध्दीपत्रकासोबत जोडण्यात आला आहे.

**(अ) जलसंधारण विभागाबाहेरील कृषी व जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता:**

मंत्रीमंडळ निर्णयास अनुसरुन जलसंपदा व कृषी विभागातील जे अधिकारी/कर्मचारी हे मृद व जलसधारण विभागाकडे कायमस्वरुपी वर्ग होण्याचा विकल्प देवू इच्छित आहेत. त्यांनी सोबत जोडलेल्या नमूना-१ मध्ये त्यांचे विकल्प भरुन ते त्यांच्या कार्यालय प्रमुख व प्रशासकीय विभागामार्फत मृद व जलसंधारण विभागाकडे विहीत मार्गाने पाठविण्यासाठी जमा करावेत.

त्याबरोबरच सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी सदर विकल्पाची एक आगाऊ प्रत Scan कॉपीच्या स्वरुपात दि. १५ जुलै, २०१७ पर्यत ई-मेलद्वारे थेटपणे मृद व जलसंधारण विभागास पाठवावी.

**ई- मेल :-** (a.chandanshive@nic.in)

तसेच, ज्या अधिकारी कर्मचा-यांना त्यांच्या विकल्पाची आगाऊ प्रत व्यक्तिश: सादर करावयाची आहे त्यांना ती खालील पत्त्यावर व्यक्तिश:सुध्दा सादर करता येईल अथवा Speed post /RPAD द्वारे दि. १५ जुलै, २०१७ पर्यत पोहोचतील अशा बेताने पाठविता येतील.

**पत्ता :-** अ.सा. चंदनशिवे, अवर सचिव (जल-२), ५ वा मजला, पश्चिम ब्रीज, मंत्रालय (विस्तार इमारत), मंत्रालय, मुंबई - ३२. फोन नं. (२२०२ २५२६)

**(ब) विभागाच्या आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता :-**

मृद व जलसंधारण विभागातील पदावर सध्या तात्पुरत्या प्रतिनियुक्तीने स्थानिक स्तर विभागात ३१५६ पदांवर व जिल्हा परिषद वर्ग - १ व वर्ग - २ मधील २२० पदांवर जलसंपदा विभागातील अधिकारी /कर्मचारी कार्यरत आहेत. ह्या सर्वांनी त्यांचे विकल्प संबंधीत अधीक्षक अभियंता यांच्यामार्फत एकत्रित स्वरुपात जलसंधारण विभागास दि. १५ जुलै, २०१७ पर्यत सादर करावेत. या विभागातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना ते यापुढे या विभागाच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी समायोजित होणार ओहत अथवा त्यांच्या मूळ जलसंपदा विभागाकडे परत जाणार आहेत याबाबतचा विकल्प देणे बंधनकारक असून त्यानुसार विभागात समावेशनाचा विकल्प दिलेल्या अधिकारी/कर्मचा-यांना मृद व जलसंधारण विभागात सामावून घेतले जाईल व उर्वरीत सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या बाबतीत संदर्भाकित शासन निर्णयातील परिच्छेद ८ नुसार कार्यवाही करण्यात येईल व संबंधीत पदांवर या विभागाद्वारे भरती करण्यात येईल. तद्नंतर संबंधीतांची या विभागातील पदांवर पदस्थापनेबाबतची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही.

**अटी व शर्ती :- उपरोक्त (अ) व (ब) येथील सर्वांकरिता**

(१) मृद व जलसंधारण विभागात कृषी व जलसंपदा विभागाकडील जे अधिकारी विकल्पाद्वारे समायोजित होण्यास इच्छुकता दर्शवितील त्यांची परस्पर संवर्गातील सेवाज्येष्ठता (Retrospective effect) गृहीत धरली जाईल. त्यांना ज्येष्ठतेचे सामान्य प्रशासन विभागाचे सर्व नियम लागू राहतील.

(२) एकदा दिलेला विकल्प कोणत्याही परिस्थितीत मागे घेता येणार नाही.

(३) विकल्प नमुन्यामध्ये माहिती भरुन देताना सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांनी सदरहू माहिती बरोबर असल्याची खातरजमा करावी. विकल्प नमुन्याच्या आगाऊ प्रतीत थेटपणे या विभागाकडे प्राप्त झालेली माहिती व संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांच्या प्रशासकीय

विभागाद्वारे विहीत मार्गाने पाठविलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याचे किंवा केल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी प्रशासकीय व फौजदारी कारवाईस पात्र राहतील.

**(४) मृद व जलसंधारण विभागामध्ये त्या त्या संवर्गाकरिता** कृषी व जलसंपदा विभागाकडील अधिकारी व कर्मचा-यांचे जास्त विकल्प प्राप्त झाल्यास पुढील निकषांवर प्राधान्यक्रम ठरवून अधिकारी/कर्मचा-यांची निवड करण्यात येईल.

**४.१) कृषी विभाग :-**

अ) M.Tech. /B.Tech. (Agricultural Engineering) ही अर्हता धारण करणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना त्या त्या संवर्गात प्राधान्य देण्यात येईल.

ब) कृषी विद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट इन ॲग्रीकल्चरल सायन्स ही अर्हता धारण करणारे व Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेले.

क) कृषी विद्या शाखेतील पदव्युत्तर पदवी किंवा डॉक्टरेट इन ॲग्रीकल्चरल सायन्स ही अर्हता धारण करणारे व Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण न केलेले.

ड) ॲग्रीकल्चरल सायन्समधील पदवीधर ज्यांनी Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे.

इ) ॲग्रीकल्चरल सायन्समधील पदवीधर ज्यांनी Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेले नाही.

ई) ॲग्रीकल्चरल सायन्समधील पदवीकाधारक ज्यांनी Soil & Water Conservation Engineerin या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले आहे.

उ) ॲग्रीकल्चरल सायन्समधील पदवीकाधारक ज्यांनी Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेले नाही.

**४.२ ) जलसंपदा विभाग :-**

अ) एम.टेक./एम.ई. सिव्हील इंजिनिअरींग ही अर्हता धारण करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना त्यात्या संवर्गात प्राधान्य देण्यात येईल.

ब) बी.ई. सिव्हील ही अर्हता धारण करणा-या अधिकारी/कर्मचा-यांना त्यात्या संवर्गात प्राधान्य देण्यात येईल.

क) अनुभवी व उच्चशिक्षीत अधिका-यांना/कर्मचा-यांना त्या त्या संवर्गात प्राधान्य देण्यात येईल.

**उपरोक्त दोन्ही विभागांकरिता :-**

**४.३)** उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक, लघु टंकलेखक व टंकलेखक या संवर्गात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील श्रुतलेखन व टंकलेखन या मध्ये कौशल्य असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य राहील.

**४.४)** तसेच, लिपिकवर्गीय संवर्गात मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील टंकलेखनाचे ज्ञान असणा-या कर्मचा-यांना प्राधान्य राहील.

सदर शासन प्रसिध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१७०५३११५०८२५४१२६ असा आहे. हे प्रसिध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ambadas Sahebrao Chandanshive

Digitally signed by Ambadas Sahebrao Chandanshive
DN c=IN o=Gove nment Of Maharashtra ou=Under Secretary postalCode 400032 st Maharashtra
2 5 4 20=8ec4809af7e642ce22fdaca42a63ca84 0ade1e 7476ac90f3c879facbf715a09 cn Ambada Sahebrao Chandanshive
Date 2017 05 31 17 09 26 05 30

**( अं.सा.चंदनशिवे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

सर्व संबंधीत अधिकारी /कर्मचारी,
मृद व जलसंधारण विभाग/जलसंपदा विभाग/कृषी विभाग.
(प्रसिध्दीपत्रकाद्वारे व वेबसाईटद्वारे)

**प्रत :**१) माहिती तथा आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.
२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
४) जनसंपर्क अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय.
५) मुख्य अभियंता, लघुसिचन (जलसंधारण) पुणे.
६) अधीक्षक अभियंता लघुसिचन (जलसंधारण) मंडळ,ठाणे/पुणे/नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
७) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ/सर्व महासंचालक.
८) सर्व मुख्य अभियंते (स्थापत्य /यांत्रिकी) सह.
९) सर्व अधीक्षक अभियंते (स्थापत्य), जलसंपदा विभाग.
१०) आयुक्त, कृषी, पुणे.

## नमुना क्रमांक - १
## (विभागाबाहेरील जलसंपदा व कृषी विभागाचे अधिकारी/कर्मचारी)

१.(अ) संपूर्ण नाव श्री. /श्रीमती ____________________________________

(ब) धारण केलेले पद ____________________________________

(क) सेवार्थ ID :- | | | | | | | | | | | | |

(ड) वेतन बँड______________ग्रेड वेतन______________

(इ) शैक्षणिक अर्हता ________________________________

(ई) Soil & Water Conservation Engineering या विषयातील प्रशिक्षण पूर्ण केले आहे/नाही. ____________________________________________

(उ) सध्याचे पद कायम/स्थानापन्न :- ______________________________

(ऊ) कार्यालयाचे नाव :- ______________________________________

(ए) जात प्रवर्ग :- ___________________________________________

(ऐ) मागासवर्गीय असल्यास वैधता प्रमाणपत्र आहे/नाही ________________

(ओ) जन्म दिनांक :- ____________________________________

(औ) सध्याच्या पदावर पदोन्नत झाल्याचा/ सरळसेवेने आल्याचा दिनांक __________

(अं) विभागीय चौकशीची कारवाई (प्रस्तावित/सुरु/पूर्ण/नाही): ______________

झालेली शिक्षा :- ____________________________________

(अ:) सेवानिवृत्तीचा दिनांक :- __________________________

२. मी श्री./श्रीमती ____________________________________मृद व जलसंधारण विभागाचा आकृतिबंध पाहिला असून माझ्या सेवा मृद व जलसंधारण विभागातील ______________________या समकक्ष पदावर कायमस्वरुपी समावेशनाने वर्ग होण्याचा विकल्प देत आहे. भविष्यात मृद व जलसंधारण विभागाचे सेवाप्रवेश नियम व सेवाशर्ती मला लागू राहतील.

३. हा विकल्प अंतिम असून त्यामध्ये बदल करण्यात येणार नाही वा मागे घेण्यात येणार नाही.

४. मृद व जलसंधारण विभागाकडे सेवा वर्ग करुन घेण्याचा अथवा न घेण्याचा अंतिम निर्णय शासनाचा ( मृद व जलसंधारण विभागाचा) राहील.

ठिकाण : सही :

दिनांक : नाव : ____________________________

ई-मेल आयडी ________________________ दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्र. ____________

प्रति,

मा. सचिव,
मृद व जलसंधारण विभाग,
पहिला मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मुंबई - ३२.
Email :- a.chandanshive@nic.in

## नमुना क्रमांक - २

**(मृद व जलसंधारण विभागातील सध्याच्या कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांच्या करिता)**

१. **संपूर्ण नाव :-** ____________________________________________

२. **पदनाम** ______________________________

३. **सेवार्थ ID :** | | | | | | | | | | | |

४. **वेतन बँड**____________________________**ग्रेड वेतन** _______________

५. **कार्यालयाचे नाव :** ________________________________________________

६. **मृद व जलसंधारण विभागात कायमस्वरुपी समायोजनाद्वारे वर्ग होण्यासाठी इच्छुक (आहे/नाही.)** _________________________

७. **(अ) जन्म दिनांक** ______________________________

**(ब) सध्याच्या पदावर पदोन्नतीने/सरळसेवेने आल्याचा दिनांक** ______________________

**ठिकाण :** **सही :**

**दिनांक :** **नाव :** ____________________

ई-मेल आयडी ________________________ ____ दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्र. _______________

**प्रति,**

**मा.सचिव,**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**पहिला मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मुंबई - ३२.**

**प्रत :-** अधीक्षक अभियंता लघुसिचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे /पुणे /नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना कळविण्यात येते की, जलसंधारण विभागातील सध्या कार्यरत असलेल्या त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे विकल्प वरील नमुन्यात घेवून सर्व मूळ नमुना फॉर्मसह सदर विकल्प एकत्रित स्वरुपात कार्यालयनिहाय शासनास विशेष दूतामार्फत दि.१५ जुलै, २०१७ पूर्वी पोहोच करावेत.

**टीप :-** विभागातील सध्या कार्यरत असलेल्या अधिका-यांनी त्यांचे विकल्प थेटपणे शासनास सादर न करता ते संबंधीत अधीक्षक अभियंत्यांकडे जमा करावेत व मुख्य अभियंता कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यानी त्यांचे विकल्प मुख्य अभियंता यांच्याकडे जमा करावेत.


सचिव
वाल्मी
जलसंधारण महामंडळ
आयुक्तालय
जलसंधारण यंत्रणा
अपर आयुक्त जलसंधारण
अपर आयुक्त प्रशासन
सह सचालक आर्थिक सेवा
उपायुक्त design IT,Training
मृद संधारण यंत्रणा
अपर आयुक्त मृद संधारण
मुख्य कार्यकारी अधिकारी
मुख्य दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी
प्रादेशिक जलसंधारण अधिकारी ६ विभाग
३ प्रादेशिक कार्यालये सभवतात
प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी ६ विभाग
जिल्हा परिषद (ल.पा) ३५ विभाग
जिल्हा सधारण अधिकारी १९ जिल्हे
जिल्हा मृदसधारण अधिकारी कार्यालये (३४ जिल्हे)
जिल्हा परिषद (ल.पा ) उप विभाग (१२७ उप विभाग)
उपविभागीय जलसंधारण कार्यालये (१२७) उपविभाग
तालुका मृदसधारण अधिकारी (३५१ तालुके)
मडळ अधिकारी मृद सधारण, २००६ मडळ कार्यालये (जि प गटाच्या ठिकाणी)